ARTHA, Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. MH. 89. Licence No. 175

वर्ष ३४ | पुणे, बुधवार, ६ नोव्हेंबर. १९६८ | अंक २१




## लोकल गाड्यांचे फुकट प्रवासी

### पकडले जाण्याच्या अपघाताचा विमा !

मुंबईमधील लोकलगाड्यातून प्रचंड गर्दी असते. त्यामुळे उतारूंची तिकिटे तपासणे रेल्वे नोकरांना अशक्य होते. एकट्या चर्चगेट स्टेशनावरून दररोज सुटणाऱ्या व तेथे येणाऱ्या आगगाड्यांची संख्या तीनशे पंचाहत्तर आहे. प्रत्येक लोकल आगगाडी उतारूंनी तुडुंब भरलेली असते. ह्या गर्दीचा फायदा घेऊन, तिकीट न काढता फुकट प्रवास करणारांची संख्या अगणित आहे. विद्यार्थी-विद्यार्थिनींचा विन-तिकिटाचे उतारू पकडण्याकडे उपयोग करण्याचा एक प्रयोग पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी नुकताच केला, तेव्हा ह्या स्वयंसेवकांना एका सकाळी एक-दोन तासातच दोनशे फुकटे उतारू सापडले. प्रत्येक स्वयंसेवकाला दर ताशी एक रुपया मानधन देण्यात आले. अशा कोवळ्या वयाच्या तरुण-तरुणींकडून पकडले जाण्याची फुकट्या उतारूंना लाज वाटेल, त्याचप्रमाणे उद्योन्मुख पिढीत जबाबदारीची जाणीव निर्माण होईल, अशी आशा व्यक्त करण्यात आली आहे. खरोखरच अशा रीतीने तिकिटे तपासण्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनींची योजना करण्यात आली, तर संस्कारक्षम पिढीवरच विपरीत परिणाम घडून येऊन ह्या जगात वागण्याचे व्यावहारिक धडे गिरविण्यास तिने प्रारंभ केला नाही, म्हणजे मिळविली ! पुढील वयात जे अनुभवाला यावयाचे, त्याचे शिक्षण आधीच पुरे होऊन नवी पिढी अधिक तरबेज व्हावयाची !

फुकट्या रेल्वे उतारूंनी स्वतःच्या संरक्षणासाठी एक अभिनव योजना केलेली आहे असे समजते. ज्यांना दररोज लोकलने प्रवास करावा लागतो, अशा सुमारे एक हजार समजातियांनी आपल्या वसाहतीत एक छुपी सहकारी सोसायटीच काढली आहे म्हणाना. हे लोक आपल्या 'दादा'कडे दरमहा थोडीशी ठराविक रक्कम भरतात. ते कधीही तिकीट काढीत नाहीत, पण सापडले गेलेच तर नियमाप्रमाणे दुप्पट भाडे व दंड भरतात. त्याची पावती ते आपल्या 'दादा'ला सादर करतात आणि त्याच्याकडून नुकसानभरपाई करून घेतात. लक्षावधी उतारूंपैकी किती पकडले जाण्याचा संभव आहे ह्याचा विमातज्ज्ञाकडून हिशेब करून त्यांनी पकडले जाण्याच्या अपघाताच्या विम्याची योजना करून हप्ता ठरवून घेतला आहे. ज्याप्रमाणे घराला आग लागण्याचा संभव फार थोडा असल्यामुळे आगीच्या विम्याचा हप्ता अत्यल्प असतो, तद्वतच हा हप्ता फारच लहान असतो. ह्या सहकारी विमा सोसायटीच्या विमेदाराला दरमहा दहा-वीस पैशात रेल्वेचा पास काढण्याइतकीच सुरक्षितता प्राप्त होते. 'एकमेका साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' ह्या न्यायाने (!) हे उतारू एकमेकांच्या मदतीने बिनधोक प्रवास करीत असतात.


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग — सांगली ( महाराष्ट्र )



## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

**मुंबई**

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — ९, बँक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.
: विभागीय कचेरी : — महाल नागपूर.

दूरध्वनी :— २५९८६४, २५९९९७, २५०१८९, २६९६६७

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल व गंगाजळी फंड | ... | रु. ११,९८,८४,००० |
| ठेवी | ... | रु. ६३,१८,९३,००० |
| खेळते भांडवल | ... | रु. १,१३,१३,७१ ००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे, सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. वसंतराव पाटील, चेअरमन

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.
श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

☆ अर्थ ☆

बुधवार, ६ नोव्हेंबर १९६८



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## आगामी संकटासंबंधी इषारा

अखिल भारतीय कारखानदार संघटनेचे अध्यक्ष मि. फाझलभॉय ह्यांनी देशातील कारखानदारीच्या सद्यःस्थितीविषयी आपले विचार व्यक्त केले आहेत. इंदूर येथे ह्यासंबंधी बोलताना ते म्हणाले की उत्पादनाची अधिक वरची पातळी गाठण्याचे प्रयत्न राष्ट्रीय कर्तव्य म्हणून करण्याची आज अतिशय निकड आहे साधनसंपत्तीचा विनियोग करण्यापेक्षाही नव्या साधनसंपत्तीची निर्मिती अधिक आवश्यक आहे. उत्पादनाची पातळी वाढली की त्याच्या मागोमाग अधिक वेतन, अधिक नफा, भांडवलाच्या संचयाचा अधिक वेग आणि अधिक करही आपोआप येतातच. वाढत्या उत्पादनाची वाटणी न्यायाने झाली पाहिजे ह्यात शंका नाही. परंतु कामगारांनी उत्पादनाची वाढ करण्यात सहभागी न होताही वाढत्या वेतनाचा आग्रह चालविला आहे आणि सरकार त्यांच्या ह्या आग्रहाचे प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष दडपण कारखानदारांवर आणीत आहे. ही परिस्थिती संकटाला आवाहन करणारी आहे. त्यामुळे निर्यातीच्या आघाडीवर अरिष्ट कोसळण्याची शक्यता आहे. निर्यात वाढ यशस्वी झाली नाही तर आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या व्यवहारात बिकट परिस्थिती निर्माण होईल. भारतात आता औद्योगिक उत्पादनक्षमता बरीच निर्माण झालेली आहे. परंतु त्याचबरोबर अनेक कारखान्यांची संपूर्ण उत्पादनक्षमता वापरली जात नाही. अशा परिस्थितीत औद्योगिक विकासासंबंधी विचार करताना सार्वजनिक मालकीचा विभाग आणि खाजगी मालकीचा विभाग ह्या विचारसरणीच्या चाकोरीतून चर्चा करणे योग्य होणार नाही.

## बुद्धिमंत माणसांना अमेरिकेचे आकर्षण

वॉशिंग्टन येथील हिंदी वकिलातीच्या शिक्षण विभागाने अमेरिकेत शिकण्यासाठी आलेल्या हिंदी विद्यार्थ्यांची पाहणी केली आहे. तीवरून असे आढळून आले की अमेरिकन इस्पितळातून सध्या ९,३४५ हिंदी डॉक्टर्स काम करीत आहेत. ही संख्या मागील वर्षाच्या मानाने ५०० ने अधिक आहे. १९६७ च्या जानेवारीला अमेरिकन शिक्षण संस्थांतून १,११९ हिंदी लोक संस्थांच्या विभाग समित्यांचे सभासद होते. अमेरिकेत १९६८ साली शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ९,५९४ आहे. त्यात डॉक्टर्स, पाहुणे प्राध्यापक, प्रशिक्षणासाठी आलेले लोक, इत्यादींचा समावेश आहे. गेल्या वर्षापेक्षा ही संख्या १,००२ ने अधिक आहे. १९६८ साली आलेल्यांत खाजगी रीतीने शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात अधिक म्हणजे ७,८३९ इतकी आहे. त्यापैकी ६,३७४ पदवीधर आहेत. ६०० स्त्रिया आहेत. सरकारने पाठविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या अवघी ६० आहे. बहुतेक विद्यार्थी कॅलिफोर्निआ, मिसिसीपी, न्यूजर्सी, न्यूयॉर्क, पेन्सिलव्हानिआ व विसकॉनसिन ह्या राज्यांतून आहेत. शिक्षणासाठी अमेरिकेत आलेल्या विद्यार्थ्यांपैकी निदान २० टक्के तरी कायमचेच अमेरिकेत राहतात; किंवा अमेरिकन नागरिकत्व पत्करतात. हिंदुस्थानात प्रशिक्षित लोकांना पुरेशी संधी मिळत नाही. शिवाय रुपयाचे अवमूल्यन झाल्यापासून हिंदी रुपयाची किंमत खूपच घटलेली आहे. हुंडणावळीच्या नव्या दराप्रमाणे अमेरिकेतील साधा कारकून भारताच्या पंतप्रधानापेक्षा अधिक वेतन मिळवितो. अशा परिस्थितीत बुद्धिमंतांचा अमेरिकेला जाणारा ओघ फोफावण्याचीच चिन्हे दिसतात.

## बँकांचा शेती-लघुउद्योगांना वाढता कर्जपुरवठा

रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनी प्रमुख बँकांच्या चेअरमन-चीफ एक्झिक्यूटिव्हजच्या सभेत, बँका शेतीला आणि लघुउद्योगांना कर्जपुरवठ्याचे बाबतीत करीत असलेल्या प्रयत्नाबद्दल समाधान व्यक्त केले. चालू वर्षी ठेवीत ४०० कोटींची वाढ होईल, अशी काही महिन्यांपूर्वी अपेक्षा होती; प्रत्यक्ष वाढ ४३० कोटी रु. ची होईल, असा अंदाज आहे. चालू वर्षातील ठेवीमधील वाढीच्या १५% रक्कम शेतीला आणि ३१% रक्कम लघुउद्योगांना देण्याचा आपला मनोदय बँकांनी व्यक्त केला. कापडगिरण्यांच्या कर्जाच्या अर्जाकडे विशेष लक्ष देण्यास बँकांना सांगण्यात आले; ह्या धंद्याची परिस्थिती अजून बिकटच आहे.

## पाकिस्तानची धान्याची आयात

चालू वर्षी पाकिस्तानला धान्याची आयात बरीच कमी करावी लागेल. ह्या वर्षी फक्त ७ लाख टन धान्य पाकिस्तानला आयात करावे लागेल. गेल्या वर्षी अवर्षणामुळे तेथे मोठ्या प्रमाणावर नापिकी झाली. त्यामुळे २५ लाख टन अन्नधान्य आयात करावे लागले.

### दिल्लीत होत असलेली माणसांची गर्दी

दिल्ली शहरातील सतत वाढत चाललेल्या माणसांच्या गर्दीबद्दल भारत सरकारचे आरोग्य व कुटुंब नियोजन मंत्री डॉ. चंद्रशेखर ह्यांनी गंभीर धोक्याचा इशारा दिला आहे. शहरे आणि ग्रामीण भाग ह्यांच्या नियोजनाविषयी दिल्ली येथे १७ वा परिसंवाद भरविण्यात आला होता. परिसंवादात बोलताना डॉ. चंद्रशेखर म्हणाले की दिल्ली शहराचा विस्तार आणि त्याची लोकसंख्या अनिर्बंधपणे वाढू दिल्यास शहराचे भवितव्य कठीण होईल. दिल्ली शहरात जास्तीत जास्त ५० लाख लोकांची व्यवस्था करता येईल. परंतु त्यापेक्षा अधिक लोक शहरात राहू लागल्यास त्यांना पाणी आणि जीवनावश्यक इतर वस्तू पुरविता येणार नाहीत. शहराची वाढ झपाट्याने झाल्यामुळे तेथील सांस्कृतिक व सामाजिक जीवन बहुरंगी झालेले आहे. त्या दृष्टीने ही वाढ स्वागतार्ह असली सुखसोयींच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे सामाजिक जीवनावर काहीसा वाईट परिणाम झाला आहे. दिल्ली शहरात दरसाल १॥ लाख नव्या माणसांची भर पडत चालली आहे. त्यामुळे घरांची टंचाई निर्माण झाली असून बेकारांची संख्याही वाढत चालली आहे. शहराला केवळ पाण्याच्या टंचाईलाच तोंड द्यावे लागते असे नाही. पाण्याप्रमाणेच दूध, दुधाचे पदार्थ, अंडी, भाजीपाला ह्यांचाही पुरवठा अपुरा आहे. ह्यापैकी कितीतरी माल आजच २०० ते ४०० किलोमीटर अंतरावरून आणावा लागत आहे. लोकसंख्येच्या वाढीबरोबर वाहतूक आणि शिक्षण ह्या बाबतीतही कुचंबणा होत आहे. ह्या वाढत्या लोकसंख्येस आळा घालणे निकडीचे झाले आहे.

---

### स्त्रीशिक्षणाचा जुना प्रश्न अजूनही नवाच

स्त्रियांच्या शिक्षणाविषयी कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ह्या संघटनेने गेल्या वर्षी एक पाहाणी केली होती. पाहाणीत असे दिसून आले की शास्त्रीय विषयाचे पदवी-नंतरचे शिक्षण घेतलेल्या स्त्रियांपैकी २५ टक्के स्त्रिया त्यांच्या त्यांच्या विज्ञान शाखेतील काहीच काम करीत नव्हत्या. ह्याचा अर्थ त्यांचा 'धंदा' घरकाम असाच राहिला. शाळा-कॉलेजांतून उच्च शास्त्रीय शिक्षण घेतल्यानंतरही इतक्या स्त्रिया जर घरकामात रुतून बसत असतील तर तो शिक्षणाचा अपव्यय म्हणावा लागेल. किंवा बऱ्याच स्त्रियांना त्यांच्या गरजा भागविणारे शिक्षणच दिले जात नाही असे म्हणावे लागेल. घरकाम करून दिवस गत करणाऱ्या हिंदमधील सुशिक्षित स्त्रियांची संख्या १० लाखांपर्यंत आहे. ह्या परिस्थितीवर भाष्य करताना भारत सरकारच्या माजी आरोग्यमंत्री डॉ. सुशिला नायर म्हणतात की स्त्रियांना साक्षर करताना आणि शिक्षण देताना त्यांच्या गरजांची साक्षरतेशी आणि शिक्षणाशी सांगड घालण्यात आली पाहिजे. बहुसंख्य स्त्रियांना अखेर घरच सांभाळावे लागत असल्याने त्यांना गृहशास्त्र, आरोग्यशास्त्र, आहारशास्त्र, अशांसारखे नेहमी उपयोगी पडणारे विषय शिकविण्यात यावेत. ह्या विषयांत बहुसंख्य स्त्रियांना आस्था वाटेल आणि भावी आयुष्यात त्यांना त्यांच्या ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग करता येईल. पुरुषांना व स्त्रियांना एकाच प्रकारचे शिक्षण देऊन उपयोगी नाही, हा विचार अलीकडे बराच जोर धरू लागला आहे. म्हणजेच स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नाने नवा अवतार घेतला आहे.

---

### ऑलिंपिक्सच्या आखाड्याचे पुढे काय होते ?

ऑलिंपिक्सच्या क्रीडास्पर्धा भरविण्यासाठी ज्या देशात त्या भरतात तेथे सर्व सोयींनी युक्त असे आखाडे बांधण्यात येतात. ते बांधण्यासाठी खूप खर्च येतो. इतका मोठा खर्च करून बांधण्यात येणाऱ्या ह्या आखाड्याचा पुढे काही उपयोग होतो की निरुपयोगी अडगळीत त्याची जमा होते ? टोकियो येथील स्पर्धासाठी जपानने बांधलेल्या प्रचंड आखाड्याला ११८ कोटी रुपये खर्च आला होता. ह्यापूर्वीच्या स्पर्धा रोम येथे भरलेल्या होत्या. तेथील आखाडा असाच प्रचंड होता. आता ह्या दोन्ही आखाड्यांचा उपयोग क्रीडास्पर्धांसाठी अर्थातच होत नाही. परंतु जपान अगर इटली ह्यांना 'आखाडे बांधण्यात नुकसान आले असा मात्र अर्थ नाही. स्पर्धांच्या निमित्ताने हौशी प्रवाशांची संख्या बरीच वाढली आणि त्यांचा सर्व खर्च निघून आला. मेक्सिको येथे नुकत्याच भरलेल्या स्पर्धांसाठी जो आखाडा बांधला होता त्यासाठी १२४ कोटी रुपये खर्च आला होता. हौशी प्रवाशांच्या वाढलेल्या संख्येमुळे ६० कोटी रुपये मिळाले. उरलेला खर्च निघण्याच्या दृष्टीने मेक्सिकोने आखाड्याजवळची वस्ती व्यवस्थित नियोजनपूर्वक बांधली होती. ह्या वस्तीत प्रेक्षागृहे, बँका, पोस्ट व टेलिग्राफ, वाहतूक, शाळा, वैद्यकीय मदत, इत्यादी सर्व प्रकारच्या सोयी करण्यात आल्या होत्या. ३ खोल्यांच्या १ हजार राहण्याच्या जागाही बांधण्यात आल्या होत्या. स्पर्धा संपल्यानंतरही ही नवीन वस्ती राहण्यासाठी फार सोयीची असल्याने तेथील राहण्याच्या जागा आता वाजवी भाड्याने देण्यात येत आहेत. येत्या दहा वर्षात आखाड्यावर झालेल्या खर्चातील बाकी खर्च ह्या मार्गाने भरून निघेल.

---

### ह्या सार्वजनिक सुट्या कशासाठी दिल्या ?

महाराष्ट्र राज्य सरकारने सार्वजनिक सुट्यांची संख्या कमी केली, त्या संदर्भात खालील माहिती उद्बोधक वाटेल. पाँडिचरी येथे २४ ऑक्टोबरला श्री. जत्ती ह्यांनी लेफ्टनंट गव्हर्नरच्या जागेची सूत्रे घेतली, त्यानिमित्त त्यांनी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली. लंडनचे शाळकरी विरुद्ध भारतीय शाळकरी ह्या टेस्ट क्रिकेटच्या सामन्याचे वेळी म्हैसूर सरकारने सरकारी कचेऱ्यांना सुट्टी दिली होती.

## परदेशी प्रवाशांना होणारा उपद्रव

चालू वर्षी भारतात सुमारे २,००,००० प्रवासी येतील, अशी अपेक्षा आहे. गेल्या वर्षी १,७५,००० प्रवासी आले होते. इस्राइलबाबत भारताचे धोरण पसंत नसल्यामुळे, ज्यू लोकांच्या नियंत्रणाखालील प्रवासी कंपन्या भारतात प्रवाशांनी जाऊ नये, असा प्रचार करीत असतात. सुएझ कालवा बंद झाल्यामुळे विमानाने येणारे प्रवासी वाढले आहेत. भारतात उतरल्यापासून परत निघेपर्यंत उतारूला भिक्षेकरी, फेरीवाले, दलाल, चलन बदलून देणारे आणि भांडखोर टॅक्सीवाले ह्यांच्याशी सामना करावा लागतो. महारोगी, आंधळे, लंगडे, ह्यांचे डॉलर आणि पौंडवाल्या-उतारूंकडे विशेष लक्ष असते. स्वताला गाईड म्हणवून घेऊन उतारूंना फसविणारेही पुष्कळ असतात. परदेशी चलनांचा काळा बाजार चालतो, त्याला रुपयांची गरज असणारे परदेशी प्रवासी अप्रत्यक्ष मदतच करतात; त्यांना रुपये देणारी अधिकृत केंद्राची अत्यंत आवश्यकता आहे. परदेशी प्रवाशांना होणाऱ्या उपद्रवाचा बंदोबस्त करण्यासाठी स्वतंत्र टूरिस्ट पोलीस फोर्सचीहि आवश्यकता आहे. ओरिसामध्ये अशा प्रकारची व्यवस्था आहे.

## हिंदुस्थान अँटिबायोटिक्स

हिंदुस्थान अँटिबायोटिक्स लि. ने १९६७–६८ मध्ये ७·७१ कोटी रु.ची विक्री केली. वसूल भांडवल २४७·२६ लक्ष रु. असून एकूण जिंदगी ८०६·३६ लक्ष रु. आहे. कंपनीला ४९·६३ लक्ष रु. नफा झाला. कंपनीने १०%च्या आर्डिनरी डिव्हिडंड व्यतिरिक्त ४% स्पेशल डिव्हिडंड जाहीर केला आहे.

## बडोद्याच्या महाराणीवर दावा

"आपले गालिचे, मद्य व इतर मालमत्ता विकून देण्यासाठी बडोद्याच्या महाराणीसाहेबांनी माझी सेक्रेटरी म्हणून नेमणूक करून विक्रीवर कमिशन देण्याचे मान्य केले, त्या कमिशनची १,७८,५८० पौंडांची रकम आपणास मिळावी" असा दावा मांडून अहमद हशिमीने लंडनमधील कोर्टात दावा लावला आहे. ४७ वर्षांच्या ह्या महाराणीसाहेबांचे लंडनमध्ये वास्तव्य असते.

## साडी उपयोगी पडली नाही

एका हिंदी तरुणाने साडी नेसून आपण १९ वर्षे वयाची तरुणी असून आपल्या आईवडिलांकडे येत आहो, असा बहाणा करून लंडनच्या विमानतळावर उतरण्याचा प्रयत्न केला. पण त्या 'तरुणी'चे रुंद खांदे पाहून पोलिसांना संशय आला. विमानतळावरील एका नर्सकरवी तपासणी केली, तेव्हा सत्य-स्वरूप प्रकट झाले आणि पुढच्या विमानाने त्याला भारताकडे परत पाठविण्यात आले. त्याच्या पासपोर्टवर जोगिंदर कौर असे नाव होते.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.


मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.

* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :- ३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [मार-सरदारगृह] क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



नको मोजण्या बोटे आतां

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि,

### मॅंगेनीजच्या निर्यातीत निम्म्याने घट

भारतामधील मॅंगेनीजच्या खाणींचा धंदा संकटात सापडला आहे. देशातून ज्या दर्जाचे मॅंगेनीजचे खनिज निर्यात करण्यात येते त्यात ५० टक्क्यापेक्षाही अधिक घट झाली आहे. त्यामुळे खाणीच्या तोंडाशी आणि बंदरातून ह्या खनिजाचे मोठे साठे पडून राहिले आहेत आणि ह्या खनिजांच्या अनेक खाणी बंद करण्यात येत आहेत. परिणामी, हजारो मजूर बेकार झाले आहेत. १९६५ पासून खनिजांची सर्व निर्यात एका कॉर्पोरेशनमार्फत करण्यात येत आहे. त्याचाही परिणाम निर्यात घटण्यात झाला आहे, असे खाण मालकांचे म्हणणे आहे. सरकारने खाण मालकांना निर्यात करण्याचे स्वातंत्र्य द्यावे, निर्यातीवर बसविण्यात आलेला कर रद्द करावा आणि रेल्वे वाहतुकीचे दर उतरवावे, अशा मागण्या त्यांनी केल्या आहेत.

---

### हॉकीच्या सामानाच्या निर्यातीने वाढती प्राप्ती

मेक्सिको येथे भरलेल्या जागतिक क्रीडास्पर्धेत भारताने हॉकीच्या खेळातील आपले पहिले स्थान गमावले. ह्या अपयशाची अनेक कारणे सांगण्यात येत आहेत. दरम्यान, हॉकीच्या खेळासाठी लागणाऱ्या सामानांची निर्यात करण्यात मात्र भारत आघाडीवर आहे. हॉकी खेळण्याच्या काठ्या, चेंडू आणि इतर साहित्य निर्यात करून परदेशीय चलन मिळविण्यात येत आहे. टोकिओ येथे जागतिक स्पर्धा भरल्या होत्या त्यावर्षी भारताने ८ लाख रुपयांचा हॉकीच्या खेळांचा माल निर्यात केला होता. चालू वर्षी ऑगस्टअखेरपर्यंत ९·१ लाख रुपये किंमतीचा माल निर्यात करण्यात आला आहे. १९६७ साली ह्या मालाच्या निर्यातीमुळे भारताला १२·८८ लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ती झाली होती.

---

### होटेल्स बांधण्याला पुरेसा प्रतिसाद नाही

परदेशीय हौशी प्रवाशांना अधिक सुखसोयी उपलब्ध करून देण्यासाठी भारत सरकार प्रयत्न करीत आहे. तथापि हे काम करण्यास पुरेसा पैसा सरकारजवळ नसल्यामुळे नवीन प्रवासी होटेल्स बांधण्यासाठी खाजगी भांडवलाला सरकारने प्रोत्साहन द्यावयाचे ठरविले. होटेल्स बांधण्यासाठी सरकारने खाजगी भांडवलाला बऱ्याच सवलती देऊ केल्या होत्या. परंतु सरकारच्या योजनेला अत्यंत निराशाजनक प्रतिसाद मिळाला. गेल्या दीड वर्षाच्या अवधीत अशा नव्या होटेल्ससंबंधी सरकारकडे प्रत्यक्ष अशा योजना फारच थोड्या आल्या. ह्या बाबतीत सरकारी कर्जाची योजना जाहीर होताच जवळजवळ तीनशे विचारणा करण्यात आल्या. प्रत्यक्ष अर्ज मात्र आठच आले आणि तेही अर्धवट.

**अर्थ** (पाक्षिक) महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते. वा. व. रु. ६=०० ट. ख. सह "दुर्गाधिवास" पुणे ४.



# बुद्धिमंतांचा अमेरिकेकडे वाहणारा ओघ अविकसित देशांना विशेष मारक

## (१)

अमेरिकेतील समृद्ध, नव्हे विलासी जीवनाच्या मोहाने सर्व जगातील तंत्रज्ञ व शास्त्रज्ञ त्या देशाकडे आकृष्ट होत आहेत. त्यातील काहीजण कर्तबगारीला चांगला वाव मिळतो म्हणूनही जातात. ह्या गुंतागुंतीच्या प्रश्नाची उकल करणारे विवेचन येथे केले आहे.

ब्रिटनमधील नोकरी पाहून देणाऱ्या एका संघटनेच्या प्रमुखाने अशी तक्रार केली आहे की, अमेरिकन लोक ब्रिटनमध्ये येतात आणि नाना प्रकारची प्रलोभने दाखवून त्यांना हव्या असलेल्या तंत्रज्ञांना व वाकबगार लोकांना फूस लावून अमेरिकेला नेतात. अमेरिकेची ही मात्रा ब्रिटनप्रमाणे इतर देशांतही अचूक लागू पडते. १९६७ साली ४२ हजार तंत्रज्ञ व कुशल व्यावसायिक परदेशातून अमेरिकेत स्थायिक होण्यासाठी गेले. कर्तबगार आणि महत्त्वाकांक्षी अशा लोकांना अमेरिकेतील वैभवाचे विलक्षण जबरदस्त आकर्षण वाटते त्याचाच हा परिणाम आहे. पण पुष्कळांची अमेरिकन लोकांनी शिकार केली असेच म्हणावे लागेल. अवकाशशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, वैद्यक व शिक्षण ह्या क्षेत्रांतील अनेक कुशल लोक अमेरिकेच्या प्रलोभनांना बळी पडलेले आहेत. फ्रान्समधील शास्त्रीय संशोधन खात्याचे मंत्री मॉरिस शूमन ह्यांनी असा अंदाज केला आहे की दुसऱ्या महायुद्धाची अखेर झाल्यानंतर युरोपमधून १ लाख उच्च प्रशिक्षित लोक कायमच्या वास्तव्यासाठी अमेरिकेला गेले. ह्या सर्वांच्या प्रशिक्षणाचा खर्च युरोपमधील करदात्यांच्या सिशावर पडलेला होता हे उघडच आहे. ब्रिटनमधील एका अंदाजाप्रमाणे एक माणूस प्रशिक्षित करण्यास २० हजार डॉलर्स खर्च येतो. ह्या हिशेबाप्रमाणे युरोपने अमेरिकेला २०० कोटी डॉलर्सची मदत दिली असा अर्थ होतो. तथापि, गरीब देशांकडून अमेरिकेला प्रशिक्षितांचा जो प्रवाह चालू आहे तो अधिक गंभीर आणि खेदजनक असा म्हटला पाहिजे. अमेरिकन इस्पितळात काम करणाऱ्या शिकाऊ डॉक्टरांपैकी एक तृतियांश डॉक्टर्स परदेशातून आलेले असतात. आणि त्यातले बरेच अविकसित देशातील असतात. काही वर्षांपूर्वी थायलंडमध्ये अमेरिकेच्या मदतीने एक वैद्यकीय शाळा स्थापन करण्यात आली होती. ५ वर्षांनंतर ह्या शाळेला शिक्षणासाठी जोडण्यात आलेल्या इस्पितळाची फार कुचंबणा झाली. कारण शाळेत शिकून तयार झालेले बहुतेक डॉक्टर्स शिकण्यासाठी अमेरिकेतील इस्पितळात काम करण्यास निघून गेले.

एका फ्रेंच मासिकाच्या विद्वान संपादकानी 'अमेरिकेचे आव्हान' ह्या नावाचे एक पुस्तक प्रसिद्ध केले आहे. पुस्तकातील विचार विवाद्य असले तरी त्याचा खूप खप झालेला आहे. त्यात ते म्हणतात की आधुनिक देशाची संपत्ती निश्चित करताना एकच नैसर्गिक साधन महत्त्वाचे आहे; ते म्हणजे बुद्धिवान लोक. ह्या विधानात सत्याचा अंश आहे. तथापि, काही जण हे विधान चूक आहे असे म्हणतात. ते कसेही असले तरी अमेरिकेत बाहेरून बुद्धिमतांचा जो ओघ वाहतो आहे त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधावर विषारी परिणाम होण्याची शक्यता आहे. नव्हे अशा परिणामाला प्रारंभ झालाच आहे. फ्रान्सचे अध्यक्ष जनरल द गॉल अमेरिकेशी कट्टया वैरभावाने वागतात. त्याच्या मुळाशी अमेरिका व युरोप ह्यांच्यात दरीसारखी पसरलेली तांत्रिक विषमता आहे. युरोपिअन कॉमन मार्केटमध्ये सामील झालेल्या देशांनी अशी तक्रार केली आहे की त्यांना अमेरिकेकडून नवीन शोध आयात करावे लागतात आणि बुद्धिमतांची निर्यात करावी लागते. हे असेच चालू राहिले तर युरोप खंड 'अविकासा'च्या गर्तेत पडल्याशिवाय राहणार नाही. पूर्व जर्मनीने वाकबगार तंत्रज्ञांचा लोंढा पश्चिमेकडे जाऊ नये म्हणून बर्लिन भिंतीची उभारणी केलेली आहे. ब्रिटिश सरकारला सादर करण्यात आलेल्या एका अहवालात इलेक्ट्रॉनिक कंपनीच्या अध्यक्षाने तर ह्या बाबतीत बायबलमधील दाखला दिला आहे. ज्याच्या जवळ थोडेफार आहे त्याला अधिक देऊन समृद्ध करावे आणि ज्याच्या जवळ फारसे काही नाहीच त्याच्याजवळून तेही काढून घ्यावे, अशा आशयाचे हे बायबलमधील वचन आहे. अमेरिका ह्याच धोरणाचा अवलंब करीत आहे.

अर्थात ह्यात नवीन असे काही नाही. किंवा फक्त अमेरिकाच फूस लावण्याचा हा धंदा करते असेही नाही. इसवी सन १४३२ मध्ये बोलोना विद्यापीठाने असा आदेश दिला होता की एका विद्यापीठातील प्राध्यापकाला आमिष दाखवून दुसऱ्या नोकरीवर ठेवणाऱ्याला देहांत प्रायश्चित्ताची शिक्षा देण्यात यावी. अमेरिकेच्या स्थापनेपासूनच त्या देशाला परदेशातून आलेल्या बुद्धिमंतांचा फायदा मिळालेला आहे. अमेरिकेचा अणुबॉंब, अग्निबाण आणि पहिली जेट एंजिने ही अशाच बुद्धिमंतांनी तयार केलेली आहेत. अमेरिकेचे कलाक्षेत्रही ह्याला अपवाद नाही. इतर देशही हाच खेळ खेळत आहेत. ऑस्ट्रेलिआ, कॅनडा, न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका ह्या देशांनी अमेरिकेपेक्षाही अधिक संख्येने ब्रिटिश प्रशिक्षितांची आयात केलेली आहे. डॉक्टर्सच्या बाबतीत तर पश्चिम युरोपने अमेरिकेइतकी तरी विनाशक उचलेगिरी केलेली आहे. ब्रिटनच्या राष्ट्रीय आरोग्य संघटनेत काम करणाऱ्या डॉक्टरांपैकी निम्मे तरी काळे अदमी आहेत. ते मुख्यतः भारत व पाकिस्तान ह्यांचे मूळचे नागरिक आहेत. ब्रिटनमधून 'अमेरिकेत गेलेल्या एका एंजिनिअराने तर आपल्या प्रयाणाचे विदारक कारण दिले आहे. त्याच्या गावी काळे डॉक्टर्स इस्पितळातून गोऱ्या लोकांच्या देहाचे शवच्छेदन करतात ही गोष्ट त्याला असह्य झाली म्हणून तो अमेरिकेला गेला असे त्यानेच सांगितले. आफ्रिकेतील दाहोमे ह्या फ्रेंच वसाहतीत एक वैद्यकीय

शाळा काढण्यात आली होती. दहा वर्षांत शाळेतून ७६ डॉक्टर्स शिकले. आता त्यांपैकी ५८ डॉक्टर्स फ्रान्समध्ये काम करीत आहेत आणि देश सोडण्याचे एकमेव कारण म्हणजे पैसा हेच आहे. तांत्रिक कौशल्य लागणाऱ्या कोणत्याही कामाला अमेरिकेत मिळणारा पगार हा युरोपमधील पगाराच्या दुप्पट अगर तिप्पट सुद्धा असतो. युरोपीय देशांतील पगारश्रेणी ही आशिआतील श्रेणीपेक्षा ५ ते १० पट अधिक असते हे लक्षात घेतले म्हणजे पैशाचे अमेरिकेतील आकर्षण किती प्रभावी आहे ते कळते.

पैशाने माणसाच्या मनावरची अनेक दडपणे नष्ट होतात आणि पैशानेच विलासी जीवन जगता येते ही गोष्ट नाकबूल करण्यात काय अर्थ आहे? पण, पैशाचा अर्थ अधिक किफायतशीर नोकरी आणि आरामशीर गृहसौख्य एवढाच मात्र नाही. बहुतेकवेळा चांगल्या नोकरीबरोबर सुसज्ज प्रयोगशाळा आणि महत्त्वाचे काम ह्यांचाही लाभ होतो. शास्त्रीय संशोधनावर व विकासावर अमेरिका दरसाल २,४०० कोटी डॉलर्स खर्च करते. इतर सर्व जगाच्या खर्चापेक्षा ही रक्कम कितीतरी पटीने अधिक आहे. साहजिकच अमेरिका तंत्रज्ञानात जगाच्या आघाडीवर आहे. ग्रंथालये घेतली तर त्यात सुद्धा अमेरिका युरोपच्या पुढे आहे. अमेरिकेत गेलेले पुष्कळसे शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ मायदेशातील परिस्थितीला कंटाळून आलेले आहेत. निदान त्यांच्या परदेशप्रयाणात ह्या बाबीला बरेच महत्त्व असते. पदार्थविज्ञान शास्त्रातील नोबेल परितोषक मिळविणारे जर्मन शास्त्रज्ञ रुडॉल्फ मॉझबोर हे म्युनिच विद्यापीठ सोडून अमेरिकेत आले. कारण, प्रयोगशाळेत त्यांना हवी असणारी काही साधने विद्यापीठाने पुरविण्याचे नाकारले.

ज्या प्रकारच्या कुशल तंत्रज्ञांची जितकी गरज आहे त्यापेक्षा अधिक प्रशिक्षित तंत्रज्ञ तयार करण्यात आल्यामुळे युरोपमध्ये गोंधळाची परिस्थिती उत्पन्न झाली आहे, त्यामुळेही परदेश-प्रयाणाला उत्तेजन मिळते. परदेशप्रयाणाचा सर्वात अधिक तडाखा ब्रिटनला बसला आहे. कारण अमेरिका व ब्रिटन ह्यांची भाषा एक आहे. विमान बांधणी आणि इलेक्ट्रॉनिक्स ह्या उत्पादन शास्त्रांतील परदेशप्रयाणाबद्दल ब्रिटनमध्ये फार कडवट टीका करण्यात येते. पण, त्यांचे प्रयाण थांबविण्यासाठी ब्रिटन फारसे काही करीत नाही असा अभिप्राय प्रे. जॉन्सन ह्यांचे शास्त्रीय विषयाचे सल्लागार मि. डोनाल्ड हॉर्निंग ह्यांनी व्यक्त केला आहे. ते म्हणतात 'ह्या तंत्रज्ञांच्या सामाजिक दर्जाचा विचार मात्र ब्रिटनमध्ये करण्यात येत नाही. तंत्रज्ञांना वरिष्ठ कंपनी अधिकाऱ्याबरोबर जेवण घेता येत नाही; किंवा त्यांना एखादा मदतनीस चिटणीसही देण्यात येत नाही.' गरीब देशांतून तर अशा प्रकारच्या अडचणी खोलवर रुजलेल्या असतात. अमेरिकेशी तुलना करता इतर देशात नव्या कल्पनांना आणि नव्या तंत्राला फारच अल्प साद मिळतो. त्यातही ह्या कल्पना अगर तंत्र जर नव्याने पुढे येणाऱ्या खालच्या मध्यमवर्गातील शास्त्रज्ञांनी अगर एंजिनिअरांनी सुचविलेल्या असतील तर पाहायलाच नको.

बुद्धिमंतांच्या अमेरिकेकडे येणाऱ्या ओघाकडे अमेरिकन लोक काही विशिष्ट दृष्टिकोनाने पहात असण्याची शक्यता नजरेआड करून चालणार नाही. ज्या ज्या लोकांना सकारण असे वाटते की, अमेरिकेत आपल्याला अधिक कार्यक्षमतेने आणि अधिक सुखासमाधानाने काम करता येईल आणि मनुष्यजातीच्या प्रगतीला हातभार लावता येईल, ते ते लोक अमेरिकेत एकत्र येत आहेत असे अमेरिकन लोकांना वाटत असेल, कोणी सांगावे? इतर देशात ह्या भावनेमुळे अस्वस्थता निर्माण होत असेल तर जे लोक त्यांना हवेहवेसे वाटतात त्यांचे जीवन अधिक आकर्षक करण्याची जबाबदारी त्या देशांनी घेतली पाहिजे. अमेरिकन विद्वत्सभेचे अध्यक्ष मि. बुर्खहार्डट म्हणतात "हा प्रश्न आहे खरा, पण तो अमेरिकेचा नाही. इतर देशांचा आहे" ज्या देशातून बुद्धिमंत बाहेर पडतात त्यांना ह्या बाबतीत काय करता येईल? पहिल्या प्रथम असा विचार येतो की पूर्व जर्मनीप्रमाणे बाहेर जाण्याची दारे त्यांना बंद करावी. पुणे येथील गोखले राज्य व अर्थशास्त्र संस्थेचे डायरेक्टर श्री. दांडेकर म्हणतात "व्यक्तीच्या मूलभूत हक्कात जगभर पर्यटन करण्याचाही हक्क आहे, हा युक्तिवाद मूर्खपणाचा आहे. तरुणांना मोहाच्या संधी देऊन परदेशी जाण्यास वाव देणे आणि मग त्यांनी मोहाचा प्रतिकार करावा अशी अपेक्षा करणे योग्य नाही. बाहेर जाण्याची दारे बंद करूनच त्यांना मदत केली पाहिजे."

बुद्धिमंतांचे परदेश प्रयाण थांबविण्यासाठी काही अर्धेकच्चे उपाय सुचविण्यात आले आहेत. काही अंमलातही आणले गेले आहेत: एक सूचना अशी की, जे लोक परदेशात जातात त्यांना आपल्या शिक्षणासाठी आलेला खर्च आपल्या देशाच्या सरकारला परत देण्यास भाग पाडावे. पण ह्या उपायात काही अर्थ नाही. विद्यार्जनासाठी घेतलेले कर्ज परदेशातील कोर्टात दावे लावून वसूल करणे सरकारी इभ्रतीला शोभणार नाही आणि त्यापासून बहुधा लाभही योणार नाही. पश्चिम जर्मनीने दुसरा एक उपाय योजून पाहिला. जर्मन भाषेतील शास्त्रीय विषयावरील नियत-कालिकांत परदेशीय कारखानदारांच्या नोकरांच्या जाहिराती छापण्यास बंदी करण्यात आली. पण, जर्मन शास्त्रज्ञ काही तेवढीच नियतकालिके वाचत नव्हते. फ्रेंच लोकांना असे वाटते की अमेरिकाविरोधीप्रचार उपयुक्त ठरेल. मॉरिस शूमन ह्यांनी मोठ्या अभिमानाने असे जाहीर केले की फ्रेंच शास्त्रज्ञ स्वतःला व्यापारी देवघेवीच्या वस्तू समजत नाहीत. ते स्वतःला विकून घेत नाहीत. पण लगेच त्यांनी अशी पुस्ती जोडली की वॉशिंग्टनमध्ये आत्महत्त्येचे प्रमाण सर्व जगापेक्षा अधिक आहे. पण फ्रान्सचा ह्या बाबतीतला अनुभव फारसा विश्वासार्ह म्हणता येणार नाही. कारण, फ्रान्समधील शास्त्रशाखांवर आज

अमेरिकेचे नियंत्रण आहे. फ्रान्सच्या उद्योगधंद्यात वापरण्यात येणारे ८० टक्के कॉम्प्युटर्स अमेरिकन बनावटीचे आहेत. काही देश असेही आहेत की त्यांना बुद्धिमंतांच्या ह्या व्यापारात तोट्यापेक्षा फायदाच अधिक होतो असे वाटते. बहुतेक विद्यार्थी आपल्या मायभूमीस परत जातात. त्याचप्रमाणे तात्पुरत्या परवान्याने आलेले शास्त्रज्ञ व तंत्रज्ञही घरी जातात. भारतामधून अमेरिकेत शिकण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी संख्या पाहून अध्यक्षीय शास्त्रीय सल्लागार काहीसे अस्वस्थ झाले आणि त्यांनी असे सुचविले की अमेरिकन विद्यापीठांनी कमी हिन्दी पदवी-धरांना प्रवेश द्यावा. पण ह्या सूचनेला हिन्दच्या सरकारी अधिकाऱ्यांनी विरोध केला. त्यांचे म्हणणे असे पडले की अमेरिकेत गेलेल्यांपैकी चारपंचमांश विद्यार्थी भारतात परत येतात. त्यांनी केलेले काम एक पंचमांश न येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेने खूप अधिक असते. तैवानमध्ये राष्ट्रीय चीनचे राज्य आहे. तेथून अमेरिकेत येणारे बहुतेक विद्यार्थी बहुधा परत जातच नाहीत. पण तरीसुद्धा सरकारने त्यांच्या परदेशप्रयाणावर बंदी घातलेली नाही अगर त्यात अडचणी उत्पन्न केलेल्या नाहीत. तैवानचे ठोक राष्ट्रीय उत्पन्न दरसाल १० टक्क्याने वाढते. तेव्हा अशा विस्तारणाऱ्या अर्थव्यवस्थेसाठी प्रशिक्षित तंत्रज्ञांची गरज लागेल. मग अमेरिकेतच राहिलेल्यामधून ते मिळविता येतील अशी तैवान सरकारची दृष्टी आहे.

### विवाह हा गुन्हा ठरला

अविवाहित हवाईसुंदरी (स्टुवर्डेस) एकाद्या पुरुषाबरोबर राहिली तरी चालते; तिला अपत्य असले तरी चालते, पण तिने कायदेशीर पती केला तर तिला नोकरीला मुकावे लागते, अशी तक्रार मिसेस सिलेस्टी लॅन्सडेल हिने केली आहे. तिला युनायटेड एअर लाइन्सनी कामावरून काढले आहे, तेव्हा तिने त्या कंपनीकडे नुकसानभरपाई मागितली आहे. "काही हवाई-सुंदरींना बाळंतपणाची रजा मिळालेली मला माहीत आहे, पण त्यांना विवाह मात्र करता आलेला नाही. विवाह करून मिसेस लॅन्सडेलने नियमबाह्य वर्तन केले, तेव्हा तिला काढून टाकणे भाग पडले, असे विमान कंपनीचे म्हणणे आहे.

### भारतात तयार केलेल्या साड्यांवर बहिष्कार

भारतात तयार केलेल्या साड्या परिधान करणाऱ्या स्त्रियांवर बहिष्कार घालावा आणि त्यांना देशद्रोही समजण्यात यावे, असे आवाहन सिलोनचे ब्रह्मचारी गृहमंत्री श्री दहनायके ह्यांनी देशभक्त सिलोन्यांना केले आहे. सिलोनमध्ये तयार होणाऱ्या साड्या चांगल्या असताना लाखो रुपयांच्या साड्यांची भारतातून चोरटी आयात करण्याचे कारण काय? असा त्यांनी प्रश्न केला. अशा चोरट्या आयातीचा धंदा करणारांना पकडण्याची कोशीस केली जाणार आहे.


## आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

# दि बेळगाव बँक लिमिटेड

(शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३०)

**आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.**

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.



दातांच्या स्वच्छतेसाठी

## ☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

### व्यापारी पिकांशी धान्यपिकांची स्पर्धा

अन्नधान्याची टंचाई लक्षात घेऊन त्या धान्याची पैदास वाढविण्यावर अलीकडे जोर देण्यात येत आहे. त्याचा परिणाम होऊन व्यापारी पिकांच्या उत्पादनाला धक्का पोचला आहे. अन्नधान्ये आणि व्यापारी पिके ह्यांच्या ह्या स्पर्धेत ताग, ऊस, आणि तेलबिया ह्यांचे उत्पादन घटण्याचा धोका निर्माण झाला आहे. व्यापारी पिकाखालील जमीन वाढविण्याची शक्यता आणखी काही वर्षे तरी फारशी दिसत नाही. म्हणून व्यापारी पिकांबाबत सकस शेतीचे तंत्र वापरण्याचा विचार चौथ्या पंचवार्षिक योजनेत करण्यात येत आहे. आतापर्यंत हे तंत्र अन्नधान्याच्या पिकांबाबतच मुख्यतः वापरण्यात येत होते. ह्या तंत्राने व्यापारी पिकांच्या दर एकरी उत्पादनात वाढ करण्यात यावयाची आहे. निवडक विभागात हा प्रयोग करून पाहाण्यात येणार आहे.

---

### प्रवास संघटनेचा नवा प्रयत्न

होशी प्रवाशांच्या प्रवासाच्या सोयी वाढविण्याच्या दृष्टीने इंडिअन टूरिस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने नवा उपक्रम हाती घेतला आहे. कॉर्पोरेशनने आपल्या स्वतःच्या मालकीचे एक मोटारींचे पथकच निर्माण केले आहे. त्यात सध्या ३१ गाड्या आहेत. त्यापैकी दोन गाड्या वातानुकूलित आहे. भारतात मोटारीने प्रवास करणारा वर्ग मुख्यतः कमी उत्पन्नाचा आहे. त्यामुळे प्रवासी वाहतुकीच्या मोटारगाड्या सुखसोयींनी युक्त अशा नसतात. वातानुकूलित गाड्या तर मुळीच नाहीत. सध्याच्या गाड्या मालवाहतुकीच्या गाड्यांचा चौकटीवर बांधण्यात येतात. त्यामुळे त्या दीर्घ पल्ल्याच्या प्रवासाला सोयीस्कर नसतात. मोटारगाड्यांवर बसविण्यासारखे वातानुकूल यंत्र अद्याप देशात तयार होत नाही.

---

### मोहेनजोदारो संस्कृतीचे अवशेष धोक्यात

मोहेनजोदारो येथे सापडलेल्या ४ हजार वर्षांपूर्वीच्या संस्कृतीचे अवशेष नष्ट होण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. भारताच्या फाळणीनंतर हे अवशेष पाकिस्तानात गेले. ह्या ठिकाणापासून सिंधू नदी जवळच वाहात असल्याने भूस्तरात झिरपणाऱ्या पाण्याने अवशेष ढासळण्याची शक्यता आहे. ही संस्कृती सामान्यतः आर्य लोकांच्या आक्रमणापूर्वीची मानली जाते. भारतामधील मनुष्यवस्तीच्या इतिहासात उत्खनित अवशेषांना महत्त्वाचे स्थान आहे. ह्या भागात अजूनही उत्खनन करण्यास वाव आहे. परंतु पाकिस्तानचे सरकार ह्याविषयी मुळीच आस्था दाखवत नाही. अलीकडेच एका अमेरिकन शास्त्रज्ञाला नवीन उत्खनन करण्याची परवानगी नाकारण्यात आली.









हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.